पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५८५ दिनांक - २८/०७/२०२३**

युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहर

## सन २०१६ पासुन विनयभंगाच्या गुन्ह्यात सुमारे ७ वर्षापासुन फरार असलेला गुन्हेगार केला जेरबंद

दि.०५/१२/२०१६ रोजी नागपुर चाळ येरवडा पुणे येथे एका महिलेस कार्यक्रमामध्ये नाचत असताना धक्का मारुन लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्या बाबत जसप्रितसिंग गुरुचरणसिंग बाला व अजय उर्फ बाटल्या संतोष कांबळे, रा ६११, कासेवाडी, भवानीपेठ, श्रीगणेश मित्र मंडळाशेजारी,पुणे यांचे विरुध्द येरवडा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक- ६२२/१६ भादवि कलम ३५४(अ), ३२३,५०९,५०४,४२७, पोक्सो ११,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्यात आरोपी अजय उर्फ बाटल्या संतोष कांबळे हा गुन्हा दाखल झाले पासुन सुमारे ०७ वर्षापासुन फरार होता त्यास पुणे शहर आयुक्तालयाने पाहिजे आरोपी म्हणुन घोषित केले होते.

दि.२७/०७/२०२३ रोजी युनिट-१,गुन्हे शाखा पुणे शहर यांचे कडील पोलीस अधिकारी व स्टाफ असे युनिट-१ च्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार **अमोल पवार व अभिनव लडकत** यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की सदर गुन्हयांत ७ वर्षापासुन फरार असलेला आरोपी नामे अजय उर्फ बाटल्या संतोष कांबळे हा त्याच्या राहते घरी आला आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी वपोनि शब्बीर सय्यद कळविली असता त्यांनी लागलीच सपोनि आशिष कवठेकर व अंमलदार यांची टीम तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करून बातमीचे ठिकाणी जावुन कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार युनिट-१ चे अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी जावुन छापा टाकुन नमुद आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **अजय उर्फ बाटल्या संतोष कांबळे,वय २५ वर्षे रा ६११,कासेवाडी,भवानीपेठ,श्रीगणेश मित्र मंडळाशेजारी,पुणे असे असल्याचे सांगितले.** त्याचेकडे येरवडा पोलीस स्टेशनकडील वरील दाखल गुन्हयाचे अनुषंगाने त्यास विश्वासात घेवुन तपास करता त्याने दाखल गुन्हा केला असल्याचे कबुल केले तसेच येरवडा पोलीस ठाणेस सदर बाबत संपर्क करुन खात्री केला असता सदरचा आरोपीत हा सन २०१६ मध्ये विधीसंघर्षित बालक असताना त्याने सदरचा गुन्हा केल्याचे व तो एम ओ बी लिस्टमधील अ क्र.१६४५ व येरवडा पो स्टे कडील पाहिजे आरोपी लिस्ट मध्ये अ. क्र. १४३ वर त्याचे नाव नमुद असल्याची माहिती प्राप्त झाल्याने आरोपीस पुढील कारवाई कामी येरवडा पोलीस स्टेशन, पुणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री रितेश कुमार,मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,श्री संदिप कर्णिक,मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री अमोल झेंडे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री सुनिल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट-१ कडील वपोनि श्री.शब्बीर सय्यद,सपोनि आशिष कवठेकर, पोलीस अंमलदार अमोल पवार,अभिनव लडकत , विठ्ठल साळुंखे यांनी केली आहे.